VOL- XII ISSUE- XI NOVEMBER 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

# समकालीन साहित्य आणि डिजीटल युग

श्रीमती प्रिती काशिनाथ राऊत
संशोधक विद्यार्थी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ ,सोलापूर

समकालीन साहित्य म्हणजे सध्याच्या काळात लिहीले गेलेले साहित्य होय. हे साहित्य वर्तमानातील सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय समस्यांवर लक्ष केंद्रित करते. या साहित्यातून त्या काळातील विचार, जाणिवा, मते व्यक्त होताना दिसतात. हे साहित्य वर्तमान काळातील व भूतकाळातील साहित्यकृतींचा संदर्भ देते. समकालीन साहित्य म्हणजे द्वितीय विश्वयुद्धानंतर वर्तमान काळातपर्यंत लिहीलेले साहित्य होय.

साहित्य म्हणजे समाज जीवनाचं प्रतिबिंब असतं. विशिष्ट समाजाचं, समजा घटकाचं त्याच्या प्रथा, परंपरा, आचार-विचार, सवयी या सर्व पैलूंचे दर्शन समकालील साहित्यातून घडतं. जसा समाज तशी संस्कृती तसेच तिचं प्रतिबिंब साहित्यामध्ये प्रतिरुप झालेले दिसते. संस्कृती आणि साहित्य यांची काहिशी समरुपी वाटचाल असते. समकालीन साहित्य म्हणजे स्वातंत्र्योत्तर कालीन साहित्य होय. या नवसाहित्याची वैशिष्ट्ये ज्या लेखकात दिसून येतात असा नवसाहित्याचा प्रतिनिधिक लेखक म्हणजे बा.सी.मर्ढेकर होय. त्यांनी मराठी कवितेत नवा आशय आणला, अभिव्यक्ती आणली. दुर्बोधता, प्रयोगशिलता, प्रतिमाप्रधानता, भ्रमनिरास, निराशा अशा विविध प्रवृत्ती त्यांच्या साहित्यात दिसतात. त्यांच्या पावलावर पाऊल टाकत अनेक लेखकांनी आपल्या साहित्यात या नव साहित्याचा अविष्कार समाविष्ट केलेला दिसतो. समाजातील विषमता जसे स्त्री-पुरुष भेद व त्यात स्त्रीला दुय्यम स्थान जातींची उतरंड, जन्माने ठरणारी वर्णव्यवस्था जनावरापेक्षाही हीन वागणूक मिळालेल्या जातील तर एकीकडे देवापेक्ष श्रेष्ठत्व प्राप्त झालेल्या जाती असे दुभंगलेले समाजजीवन आपल्या साहित्यातून प्रकटण्याचा प्रयत्न समकालीन साहित्यातून करण्यात आला.

१) वास्तववाद २) समग्रता ३) आधुनिकता ही वैशिष्ट्ये कथा, कविता, कादंबरी, नाटक या समकालीन साहित्यात दिसुन येतात. बाळ कोल्हटकर, पु.ल.देशपांडे, मधुसुदन कालेलकर, वसंत कानेटकर यांची नाटके व त्यातून चित्रित होणारे प्रसंग तसेच रणजीत देसाई, शिवाजी सावंत, बाबासाहेब पुरंदरे यांच्या कथा, कादंबऱ्यातून समाज दर्शन व ऐतिहासिक घटनांचा परामर्श घेता येतो. 'चक', 'माहिमची खाडी', 'हातभट्टी' यातून झोपडपट्टी मधी जीवनाचे यथातथ्य वर्णन दिसून येते. 'अपराध मीच केला' या नाटकातून समाजातील वास्तव समाजापुढे मांडून वर्तमानाचा वेध घेण्यात आला. समकालीन साहित्याचा कालखंड हा ढोबळमानाने १९४०-५० पासून मानला जातो. या कालखंडात घडलेल्या दोन महत्त्वपूर्ण घटनांचा प्रभाव जागतिक साहित्यावर तसेच मानवी जीवनावरही झालेला दिसून येतो. दुसरे महायुद्ध व भारताचे स्वातंत्र्य या दोन्ही घटनामुळे भारतीय जनजीवन मुळासकट ढवळून निघाले. सांस्कृतिक जीवनात त्यामुळे मोठे बदल झाले. त्यामुळे मराठी साहित्याचा साचेबद्धपणा नष्ट झाला. जागतिक साहित्यामध्ये नवनवीन प्रवाह निर्माण झाल्याचे दिसून आले. भारतीय स्वातंत्र्यामुळे समाजजीवनात बरीच उलथापालथ झाली.

दलितांचे धर्मांतर, निद्रिस्त ग्रामीण समाजातील जागृती, समान नागरिकत्व, शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार जाती जमातीमधील भाव-भावना इच्छा आकांक्षाचे प्रतिबिंब समकालीन साहित्यातून प्रकटताना दिसून येते.

- **डिजीटल युग** :-

डिजीटल युग म्हणजे संगणक युग होय. सर्व काही इंटरनेटच्या व्यापक वापरावर अवलंबून असणारे सध्याच युग म्हणजे डिजीटल युग होय. ज्यामध्ये तंत्रज्ञानाचा विशेषत: इंटरनेट, संगणक आणि मोबाईल उपकरणांचा व्यापक वापर केला जातो. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), मशीन लर्निंग

(ML) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (IOT) या अलिकडील नवीन डिजीटल सुविधांच्या माध्यमातून समाजामध्ये अनेक नवीन परिवर्तन दिसून येतात. व्यवसायांना अधिक कार्यक्षम व फायदेशीर बनविण्यास मदत करणाऱ्या या डिजीटल सुविधा आहेत. तसेच Instagram, Twitter, Facebook, Tiktok या सोशल मिडीयाच्या साधनांमुळे माहितीचा स्त्रोत अतिशय वेगवान झाला आहे.

जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती काही सेकंदात प्राप्त करण्यासाठी व पोहचविण्यासाठी या माध्यमाचा वापर केला जात आहे. यामुळे जग ग्लोबल झाले आहे. नाविन्य गोष्टींचा तात्काळ अविषकार होत आहे. खेड्यापाड्यातही आधुनिकता दिसून येत आहे. लोकांच्या समाज जीवनावरही विलक्षणीय परिणाम दिसून येत आहे. रुढी-परंपरा, आचार-विचार, वेशभूषा-केशभूषा या सर्वच गोष्टीतील परिवर्तन म्हणजे इंटरनेटचा वाढता प्रभाव होय.

लेखक आणि वाचक यांच्यात एक पूल म्हणून प्रसारमाध्यमे कार्य करतात. थेट संवाद, अभिप्राय याची सोय असते. त्यामुळे सध्या प्रसार माध्यमे व लेखक यांच्यात एक सखोल संबंध निर्माण होताना दिसत आहे. वाचकांना त्यांच्या आवडीच्या लेखकाकडून तसेच नवीन लेखकाकडून थेट नवीन कथा प्राप्त करुन घेता येतात. त्यामुळे त्यांचा साहित्यिक प्रवास समृद्ध होऊन वाचक वर्ग सुखावतो. लेखकालाही चाहते समुदाय मिळतात. त्यामुळे त्यांची लोकप्रियता व प्रतिबद्धता वाढते व त्याची पोहोचही मिळते. अन प्रभाव वाढतो. ही एक गतिमान जागा आहे जिथे लेखकाला 'निर्माता' बनण्याची संधी प्राप्त होते.

विविध ब्लॉगज तयार करुन त्या माध्यमातून जास्त प्रमाणात वाचकवर्ग तयार करता येतो. लेखकाच्या नवनिर्मितीचा फीडबॅक लगेचा कमेंट च्या माध्यमातून प्राप्त होतो. यामुळे वाचकांच्या आवडी निवडीचा अंदाज लेखकाला घेता येतो. जगाच्या कानाकोपऱ्यात आपले साहित्य पोहचवून सर्वव्यापी साहित्यप्रेमी तयार करता येतात. वाचकाला नेमकं काय हवं आहे. त्याचा रस अन कल या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन लेखनाची दिशा अन दशा ठरविता येते. कमी खर्चात जास्त उत्पादकता मिळविण्याचा हा सर्वोत्तम पर्याय आहे. या डिजीटल युगामुळे अनेक गोष्टींची पुर्तता होते. समकालीन साहित्यात अन डिजीटल युगात बरीच तफावत दिसून येत आहे. डिजीटल युगाने वेगाने प्रगती साधली आहे. डिजीटल युगामध्ये माहितीचा स्त्रोत काही सेकंदात समाजापर्यंत पोहचला जाते. त्यामुळे याचा फायदा लेखकाला मिळतो. प्रसार माध्यमे जशी फायदेशीर आहेत तशीच ती धोकादायक सुद्धा आहेत. त्याचे अनेक धोके दिसुन येतात जसे अविश्वसनीयता, हॅकिंग, संदिग्धता या धोक्यामुळे लेखकाला त्याच्या साहित्याची चोरी होण्याची जास्त प्रमाणात राहू शकते. स्वत:चे लिखाण आपलेच आहे हे सिद्ध करताना दमछाक होणे संभाव्य आहे. एकाच नावाची अनेक लोक असल्यामुळे आपला पुरावा देण्यास समक्ष करत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे या डिजीटल युगाला स्विकारण्याची तयारी पटकन दर्शवली जात नाही. परंतु सध्याच्या धकाधकीच्या दुनियेत वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी अन समाजाच्या निकट पोहचण्यासाठी डिजीटल युगाला स्विकारल्याशिवाय पर्याय नाही.

अशा प्रकारे समकालीन साहित्यावर डिजीटल युगाचा होणारा चांगला अन वाईट परिणाम दिसून येते.

**संदर्भ** :-

१) समकालीन साहित्य, प्रवृत्ती आणि प्रेरणा, द.भि. कुलकर्णी, अभिनंदन ग्रंथ
२) भालचंद्र नेमाडे : मराठी साहित्य प्रेरणा व स्वरुप
३) प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा- डॉक्टर भास्कर शेळके व डॉ. मिलींद बसवे
४) फडके द.ना. (२००५) ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण पुणे युनिव्हर्सल प्रकाशन